लोकमत
लोकमत समाचार
LOKMAT TIMES
LOKMAT HELLOS SUPPLEMENTS

लोकमत

# सायबर गुन्हेगारीपासून सुरक्षिततेचे मार्गदर्शन

**काक्रंबा :** लातूर येथील राजर्षी शाहू महाविद्यालय व पुण्यातील क्विक हिल फाउंडेशनच्या वतीने तुळजापूर तालुक्यातील सलगरा (दि) येथील कै अंबामाता कनिष्ठ महाविद्यालय 'सायबर गुन्हे साक्षरता कार्यशाळा' घेण्यात आली. यावेळी क्रांती वाघमारे यांनी विद्यार्थ्यांना वाढत्या सायबर गुन्ह्यांपासून वाचण्यासाठी काय केले पाहिजे, याचे सविस्तर मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसनही केले. याप्रसंगी प्राचार्य श्री लोमटे, डी. एन. फैयाज पटेल, किरण लोमटे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. फैयाज पटेल यांनी आभार मानले.

Hello Dharashiv
Page No. 2 Sep 17, 2024
Powered by: erelego.com